# वार्षिक अहवाल २०२२–२०२३

## बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**१०.१ वृत्तांत वर्षात नियतकालिके व ग्रंथ खरेदीसाठी खालील निधी मंजूर होता.**

**अ) विद्यापीठ निधी:** रू. २,७५,००,०००/– एवढी अंदाजपत्रकीय तरतूद अहवाल वर्षात नियतकालिके व ग्रंथ खरेदीसाठी उपलब्ध होती. सदर मंजूर निधीतून नियतकालिकासाठी रु. २,५५,००,०००/– व ग्रंथखरेदीसाठी रु. २०,००,०००/– एवढी रक्कम उपलब्ध होती. सदर उपलब्ध निधीतून नियतकालिकांच्या (छापील व ओनलाईन) वर्गणीसाठी रु. २,४८,०९,८४८.८५/– आणि ग्रंथ/ई– बुक्स खरेदीसाठी रु. १८,१७,०२८/– चा विनियोग करण्यात आला.

**१०.२ ग्रंथसंग्रह:**

**अ)** दि.३१/०३/२०२३ रोजी विद्यापीठ ग्रंथालयात ग्रंथ, नियतकालिकांचे बांधीव संच व हस्तलिखिते यांची एकूण संख्या खालीलप्रमाणे होती.

| ग्रंथ | ई–बुक्स | नियतकालिकांचे बांधीव संच | हस्तलिखिते | प्रबंध /लघुप्रबंध | रिपोर्ट | ब्रेल बुक्स | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २,८०,१७४ | १,१९६ | ३८,६१३ | ९,१६३ | १२,१०१ | ७,०७१ | ५९० | ३,४८,९०८ |

**ब) वृत्तांत वर्षातील वाढ:** वृत्तांत वर्षात २०२२–२३ मध्ये विद्यापीठ निधीतुन ७६९ ग्रंथ खरेदी केलेले आहेत. कॉन्टीजन्सीद्वारे १११ ग्रंथ खरेदी केले आहेत. देणगीद्वारे आलेल्या ग्रंथांची संख्या २१०९ एवढी आहे. अशा रितीने, अहवाल वर्षातील एकूण ग्रंथसंख्या वाढ २९८९ आहे.

विद्याशाखा निहाय खरेदी केलेले ग्रंथ/ई–ग्रंथ यांची विभागणी पुढीलप्रमाणे:

| अ. क्र. | विद्याशाखेचे नाव | ग्रंथ | ई–ग्रंथ |
|---|---|---|---|
| १. | सायन्स आणि टेक्कनोलॉजी | ११२ | ५२ |
| २. | वाणिज्य आणि व्यवस्थापन | ९ | – |
| ३. | मानव्य विद्याशाखा | १०८ | ५६ |
| ४. | आंतरविद्याशाखीय विद्याशाखा | २८ | – |
| ५. | सामान्य | ५१२ | – |
| | एकुण | ७६९ | १०८ |

१. कॉन्टीजन्सीमधून खालीलप्रमाणे १११ ग्रंथ संशोधन प्रकल्प /इतर योजना /इतर कोर्सेस व संशोधन योजने अंतर्गत खरेदी केले आहेत.

| Sr. No. | Budget Heads under Projects | No. of Books |
|---|---|---|
| 1 | Applied Chemistry (A.63.P.4) | 12 |
| 2 | Gandhi Studies (A.61.P.4) | 5 |
| 3 | Commerce & Management (MBA )(A.57.P.4) | 9 |
| 4 | Ind. Chemistry (A.21.P.4) | 36 |
| 5 | Pad. Lat. Dr. G. G. Jadhav chair in Journalism (A.70.P.4) | 8 |
| 6 | Psychology (A.69.P.4) | 16 |
| 7 | Political Science (A.30.P.4) | 14 |
| 8 | YCSRD (A.67.P.4) | 11 |
| | Total | 111 |

**ड) अहवाल वर्षात ग्रंथ संपादन विभागामध्ये देणगीदारांकडून देणगीदाखल प्राप्त झालेल्या पुस्तकांची संख्या खालीलप्रमाणे आहे.**

**१) ग्रंथ खरेदी विभाग**

| Sr. No. | Names of the Donor | Number of Books |
|---|---|---|
| 1. | सयाजीराव गायकवाड, सोलापूर | 04 |
| 2. | सुभाष धुमे, कोल्हापूर | 13 |
| 3. | विश्वनाथ इटकर, मुंबई | 03 |
| 4 | वसंत रामचंद्र सुतार, कोल्हापूर | 04 |
| 5. | स्वयम चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई | 03 |
| 6. | मीरा बडवे, पुणे | 03 |
| 7. | विश्वनाथ जाधव, आटपाडी सांगली | 05 |
| 8. | सुनिल दादा पाटील, जयसिंगपूर | 04 |
| 9. | क्मल चोपडा, दिल्ली | 03 |
| 10. | धर्म प्रिया बी.एस. सहवाल, अजमेर, राजस्थान | 03 |
| 11. | प्रविण आनंद देवरे, मुंबई | 07 |
| 12. | सुनिल दादा पाटील, जयसिंगपूर | 03 |
| 13. | श्रीपाल जर्दे , कोल्हापूर | 09 |
| 14. | ISKON Temple, Juhu, Mumbai | 18 |
| 15. | Ministry of India, New Delhi | 22 |
| 16. | D. R. Ingaval, Shivaji University, Kolhapur | 05 |
| 17. | V. C. Office, Shivaji University, Kolhapur | 13 |
| 18. | डॉ. जयसिंगराव पवार, कोल्हापूर | 16 |
| 19. | डॉ. सुनिल दादा पाटील, जयसिंगपूर | 04 |

| Sr. No. | Names of the Donor | Number of Books |
|---|---|---|
| 20. | डॉ. कुमार ननावरे, कोल्हापूर | 03 |
| 21. | प्रा. डॉ. तानाजी रामचंद्र हवलदार जांभळेवाडी, शिराळा | 04 |
| 22. | प्रा. डॉ. एस. बी. ओऊळकर. तुर्केवाडी, कोल्हापूर | 04 |
| 23. | विजय रामचंद्र जगताप श्रीपादनगर, इचलकरंजी | 10 |
| 24. | स्वाती दिगंबर पोवार, मुंबई | 09 |
| 25. | Amenah M. Waleed Research Student S U Kolhapur | 05 |
| 26. | प्रा. शिवाजी जाधव पाचगाव, कोल्हापूर | 05 |
| 27. | एजन्सी फॉर दी लीगल डीपॉजिट लायब्ररी, इचलकरंजी | 04 |
| 28. | भारतीय विश्वविद्यालय संघ नई दिल्ली | 04 |
| 29. | Others | 80 |
| | Total | 270 |

**इ) नियतकालिके विभाग:**

अहवाल वर्षात १४ विदेशी ऑनलाईन नियतकालिके आणि १७ डटाबेसेस (American Mathematical Society, JSTOR Archive Journal & Primary Source, Institute of Physics, Academic Video Online, Proquest Dissertations & Theses Global, J-Gate Science and Technology, J-Gate Social Science and Humanities, Cambridge University Press, Taylor and Francis, Wiley, Emerald ESS Journals, APS All Package-Online Access, Oxford University Press, SciFinder Academic Unlimited Access Plan, Science Direct 7 Subject Collection) ची वर्गणी भरली होती, तसेच ६६ भारतीय मुद्रित नियतकालिकांची वर्गणी भरण्यात आली व त्याप्रमाणे ती ग्रंथालयास प्राप्त झाली. २९१ छापील नियतकालिके देणगी स्वरूपात प्राप्त झालेली आहेत. तसेच मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेतील १० वर्तमानपत्रे वाचकांसाठी उपलब्ध केली आहेत.

**फ) प्रबंध – लघु प्रबंधव अहवाल विभाग:**

अहवाल वर्षात २१ अहवालांची व ३१७ शोधप्रबंध व लघुप्रबंध यांची विभागात भर पडली. तसेच इन्फलिबनेट च्या ‘शोधगंगा’ या संकेतस्थळावर ४७०० प्रबंध उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**१०.३ ग्रंथालयीन सेवा:**

**अ–पुस्तके व नियतकालिके देवघेव :**

वृत्तांत वर्षात नोंदलेल्या वाचकांची संख्या २१६९ एवढी आहे. या वर्षात देवघेव विभाग व टेक्स्ट बूक विभाग येथून एकूण ३९,७२० ग्रंथांची देवाणघेवाण करण्यात आली. तसेच संलग्न महाविद्यालयातील व शैक्षणिक संस्था मधील ४ शिक्षकांनी ग्रंथालय सेवेचा लाभ घेतला. ग्रंथालय विभागात विद्यार्थ्यांसाठी ‘मुक्तद्वार प्रवेश पध्दत’ उपलब्ध आहे.

१. एकूण ४२ वाचकांना आवश्यक ते शुल्क भरून संदर्भ सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

२. एकूण १८७ ज्येष्ठ नागरीकांनी प्रत्येकी रु. १०००/— याप्रमाणे अनामत रक्कम भरून ग्रंथालयाचे कायमचे सभासदत्व घेतले आहे.

३. स्पर्धा परीक्षा व नेट / सेट इत्यादी परीक्षांना बसलेल्या १६० विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत बसण्यासाठी प्रत्येकी रू. १४७/— मासिक शुल्क भरून ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

४. एकूण ११ वाचकांनी झेरॉक्स सुविधेचा लाभ शुल्क भरून घेतला.

५. अहवाल वर्षापर्यंत एकूण १८७८ विविध विषयांवरील सीडी रोम उपलब्ध आहेत.

**ब— अभ्यासिका बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र:**

राष्ट्रीय सुट्टीचे दिवस सोडून इतर सर्व दिवशी सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत अशी १८ तास अभ्यासिका सुरू ठेवण्यात आली. अभ्यासिकेमध्ये दररोज सरासरी ५३२ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. सदर अभ्यासिकेचे व्यवस्थापन डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनातील 'कमवा व शिका' या योजनेतून शिक्षण घेणा—या अंशकालीन विद्यार्थ्यांमार्फत करण्यात आले.

**ब.१. अभ्यासकेंद्र (विमान बिल्डिंग):**

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील सर्व संलग्न महाविद्यालयातील पदवीपूर्व विद्यार्थी व विद्यापीठाच्या पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी यांना वाचनाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी अभ्यासकेंद्राची स्थापना करण्यात आली आहे. एम.फिल., पी. एच. डी. विद्यार्थी तसेच नेट / सेट व स्पर्धा परीक्षेस बसणा—या विद्यार्थ्यांनाही या अभ्यासिकेत प्रवेश दिला जातो.

सन २०२२—२३ या शैक्षणिक वर्षात कोल्हापूर शहरातील विविध महाविद्यालयात शिकणा—या १६८ विद्यार्थ्यांना अभ्यासिकेत प्रवेश देण्यात आला. नेट / सेट व स्पर्धा परीक्षेच्या तसेच पदव्युत्तर विभागातील २५० विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेचा उपयोग करून घेतला.

हे अभ्यासकेंद्र दररोज व सर्व सुट्टयांच्या दिवशी सकाळी ६ ते रात्री १२ असे १८ तास अभ्यासासाठी खुले असते.

या केंद्रात पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी लागणारी क्रमिक पुस्तके व संदर्भ ग्रंथ ठेवण्यात आले असून ती ओळखपत्रावर संदर्भासाठी दिली जातात.

एकूण ग्रंथांची संख्या १३,६४८ इतकी आहे तसेच ०६ वर्तमानपत्रे विद्यार्थ्यांसाठी घेतली जातात. प्रति विद्यार्थी रु. २३४/— फक्त ग्रंथालय शुल्क म्हणून आकारण्यात आले. अभ्यासिकेमध्ये वाचकांच्या हजेरीचे प्रमाण २८० इतके होते. पदव्युत्तर विभागातील काही प्राध्यापकांनी या ग्रंथालयाचा उपयोग करून घेतला.

**क —नियतकालिक विभाग:**

नियमित व संशोधक विद्यार्थ्यांच्या वाढत्या मागणीची गरज भागविणेसाठी नियतकालिक विभाग कामकाजाच्या दिवशी, दुस—या व चौथ्या शनिवारी सकाळी १०.२० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत असा ७.३० तास

कार्यान्वित होता. सदर विभागाचा दररोज सरासरी १५ वाचकांनी लाभ घेतला. नियतकालिके विभागातर्फे विद्यापीठ व महाविद्यालयाच्या बातम्यांची कात्रण सेवा प्रशासकीय उपयोगासाठी दिली जाते. शिक्षणासाठी व संशोधक विद्यार्थ्यांसाठी ॲकॅडमीक रिसोर्स सेंटरची सेवा दिली जाते.

**ड–: अर्काइव्हल सेल विभाग**

अर्काइव्हल सेल विभागातील ५७,१७७ ग्रंथ व ९,१६३ हस्तलिखिते बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रात उपलब्ध आहे. अहवाल सालात. ९३५ संशोधकांनी व वाचकांनी अभ्यासासाठी या विभागाचा लाभ घेतला.

**ई–प्रबंध, शोधनिबंध व अहवाल व संदर्भ विभाग:**

या विभागात या विद्यापीठाने मान्य केलेले एम. फील., पी. एच. डी., लघु व दीर्घ संशोधन प्रबंध, शोधनिबंध, लोकसंख्या अहवाल (सेन्सस रिपोर्ट), जिल्हानिहाय सांख्यिकी अहवाल व संदर्भ साधने, इत्यादी संशोधक /अभ्यासकांच्या उपयोगासाठी ठेवले आहेत. या कालावधीत १३०७ विद्यार्थ्यांनी, दररोज सरासरी ५५ संशोधक विद्यार्थ्यांनी या विभागाचा लाभ घेतला. या विभागात विविध विषयांवरील एकूण ८१३३ पुस्तके संदर्भासाठी उपलब्ध आहेत.

**फ– समावेशी शिक्षण संसाधन केंद्र ( आर. सी. आय. ई.) :**

राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रूसा) कार्यालय, महाराष्ट्र शासनाने शिवाजी विद्यापीठास समावेशी शिक्षण संसाधन केंद्र स्थापण्यास मंजूरी दिलेली आहे. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राच्या विस्तारीत इमारतीमध्ये हे केंद्र कार्यान्वित आहे. शिवाजी विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयातील, अधिविभागातील, विशेष शाळेतील सक्षम नसलेले दृष्टीहीन, श्रवणदोष, शारिरीकरित्या अपंगत्व व मानसिक दृष्टया अकार्यक्षम असलेल्या विद्यार्थ्यांचा विकास व समावेश यासाठी हे केंद्र काम करते. या केंद्रामध्ये ब्रेल बूक्स,ई–रिसोर्सस, संगणक व स्क्रिन रिडिंग सोफ्टवेअर, इंटरनेट / वायफाय, लो व्हिजन डिवाइसेस (मॅग्नीफायर, सी.सी.टी.व्ही, चष्मे इत्यादी ) लो व्हिजन विद्यार्थ्यांसाठी आधुनिक उपकरणांचा समावेश आहे.

**RCIE चे वापरकर्ता तपशील:**

| अ. नं. | वापरकर्ते अपंगत्व प्रकार | वापरकर्त्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | दृष्टीदोष | ३६ |
| २. | शारीरिककमजोरी | ५५ |
| ३. | श्रवणकमजोरी | ५७ |
| | वापरकर्त्यांची एकूण संख्या | १४८ |

**१०.४ ग्रंथालय संगणकीकरण सद्यस्थिती:**

ग्रंथालयातील वाचन साहित्याचे Retroconversion SOUL 3.0 या संगणक प्रणालीत करण्याचे काम सुरू असून सदर वाचन साहित्याची सुचीबद्ध माहिती ग्रंथालय OPAC / WebOPAC System वर इंटरनेटद्वारे उपलब्ध करण्यात आलेली आहे. याबरोबरच नव्याने खरेदी केलेल्या पुस्तकांचे उपार्जन, तालिकीकरण, तांत्रिक प्रक्रिया व ग्रंथदेव–घेव मोडयुल्स इ. SOUL या संगणक प्रणालीत चालू करण्यात आलेल्या आहेत. OPAC, इंटरनेट आणि –ई–रिर्सोसेस इत्यादी ऑनलाईन सुविधा देखील ३३ संगणकामार्फत, २ वर्कस्टेशन व २५ टर्मीनलमार्फत दिल्या जातात.

**१०.५ शिव ज्ञानसागर:–**

शिव ज्ञानसागर: शिवाजी विद्यापीठाची इंस्टिटयुशनल रिपॉझिटरी आहे. शिव ज्ञानसागर हे वार्षिक अहवाल, दीक्षांत समारंभातील भाषणे, फोटो, प्रबंध, पेटंट्स, संशोधन पेपर्स, कॉन्फरन्स प्रोसिडिंग्स, वृत्तपत्रे, प्राध्यापकांची प्रकाशने आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रकाशने तसेच इतर प्रकाशनांच्या प्रसारासाठी एक संस्थात्मक इंस्टिट्युशनल रिपॉझिटरी आहे. सदर रिपॉझिटरीमध्ये प्रकाशने संग्रह करणे, इंडेक्स करणे, प्रसार आणि जतन करण्याची क्षमता आहे. शिवाजी विद्यापीठाच्या ई–वापरकर्ता समुदायासाठी तसेच समाजासाठी हे उपयुक्त ई–संसाधन संग्रह आहे. एकूण ३८५८ इतके फुल–टेक्स्ट वाचन साहित्य २४ × ७ उपलब्ध आहे.

**१०.६ ग्रंथ बांधणी–**

अहवाल सालात १५०० नियतकालिकांचे अंक आणि १५ ग्रंथ यांची बांधणी करून घेण्यात आली आहे.

**१०.७ विद्यापीठातील चतुर्थश्रेणी कर्मचा–यांच्या मुलांना क्रमिक पुस्तके देण्याची योजना :**

०१ जुलै २०२२ ते ३० जुन २०२३ या कालावधीत २५ क्रमिक पुस्तकांचा लाभ ३ कर्मचा–यांच्या ३ मुलांनी या योजने अंतर्गत घेतला आहे.

**१०.८ शिक्षकांची वैयक्तिक ग्रंथालय योजना:**

०१ जुलै २०२२ ते ३० जुन २०२३ या कालावधीत १७ शिक्षकांनी व कर्मचा–यांनी असे मिळून एकुण १७ जणांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

**१०.९ ग्रंथालय पहावयास आलेले वाचक / पर्यटक:**

अहवाल सालात महाविद्यालये /शैक्षणिक संस्था येथील सहली व अभ्यास सहलीसाठी आलेले एकूण ३१५ विद्यार्थी /पर्यटक यांनी बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रास भेट दिली.

**१०.१० विशेष घटना:**

१. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र आणि ग्रंथालय आणि माहिती शास्त्र अधिविभागाच्या वतीने दि. २४ मे २०२३ रोजी '' माय लायब्ररी माय लाईफ '' या विषयावर संयुक्तपणे एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनार आयोजित केला होता.

२. दीक्षांत समारंभ ग्रंथमहोत्सव २०२३ निमित्त २८—२९ मार्च २०२३ दरम्यान एक भव्य ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

३. २८ फेब्रुवारी २०२३ रोजी रा ट्रीय विज्ञान दिनानिमीत्त जागतिक आरोग्यासाठी जागतिक विज्ञान या विषयावरील पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

४. विद्यापीठातील नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय उद्‌बोधक कार्यक्रम ५ जानेवारी ते ६ जानेवारी २०२३ रोजी व्याख्यान सादरीकरणाव्दारे ग्रंथालयाची माहिती सादर करून (पी.जी. आणि संशोधक विद्यार्थी) करिता आयोजित करण्यात आले होते आणि त्यानंतर ९ जानेवारी ते १३ जानेवारी २०२३ दरम्यान ग्रंथालय अभ्यास दौरा विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता.

५. मुंबई बॉम्बस्फोटातील पोलीस कर्मचा—यांच्या बलिदानाचा सन्मान करण्यासाठी दि. २६ नोव्हेंबर २०२२ रोजी 'शहीद दिन' साजरा करण्यात आला आणि त्याच दिवशी भारतीय संविधान दिन देखील साजरा करण्यात आला.

६. दिनांक १५ ऑक्टोबर २०२२ रोजी सर्व विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय ''वाचन प्रेरणा दिन'' कार्यक्रम आयोजित केला होता. डॉ. सुनिता बोर्डे—खडसे यांनी 'वाचन प्रेरणा आणि तरूणाईची ध्येयप्राप्ती' या विषयावर अप्रतिम व्याख्यान दिले.

७. दि. ७ ऑक्टोबर २०२२ रोजी पी. जी. व संशोधक विद्यार्थ्यांकरिता SciFinder यांनी एक दिवसीय वाचकांसाठी उद्‌बोधन कार्यक्रम आयोजित केला होता.

८. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राने २३ सप्टेंबर २०२२ रोजी सेबी ऑफीस मुंबई च्या सहाय्याने सर्व कर्मचारी व सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांन करीता 'वित्तीय साक्षरता व अर्थ स्वतंत्रता' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

९. ग्रंथालयाचे आय. एस. ओ. ९००१:२०१५ री— सर्टिफिकेशन ऑडिट २ सप्टेंबर २०२२ रोजी झाले.

१०. १ ऑगस्ट २०२२ रोजी बॅ. बाळासाहेब खर्डेकर जयंती साजरी करण्यात आली.

११. ग्रंथालय आणि माहिती शास्त्र अधिविभागाच्या ५९ व्या स्थापना दिनाच्या पूर्वसंध्येला बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र आणि ग्रंथालय आणि माहिती शास्त्र अधिविभागाच्य वतीने दि. २२ जुलै २०२२ रोजी '' रिसर्च आणि पब्लिकेशन इथीक्स '' या विषयावर संयुक्तपणे एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनार आयोजित केला होता.

**१०.११ प्राप्त पुरस्कार २०२२–२०२३**

१. १८ नोव्हेंबर २०२२ रोजी शिवाजी विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठाच्या सहाय्यक सेवा विभागांतर्गत 'स्वच्छता सप्ताह अभियान– प्रशासकीय गुणवत्ता अभियान' दरम्यान ग्रंथालयाची उत्कृष्ट देखभाल केल्याबद्दल बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रास प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले.

२. १८ नोव्हेंबर २०२२ रोजी शिवाजी विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठाच्या सहाय्यक सेवा विभागांतर्गत 'स्वच्छता सप्ताह अभियान– प्रशासकीय गुणवत्ता अभियान' दरम्यान स्टडी सेंटर ग्रंथालयाची उत्कृष्ट देखभाल केल्याबद्दल स्टडी सेंटर ग्रंथालयास तृतीय पारितोषिक प्रदान करण्यात आले.